लोकमत



शिवराज्याभिषेक दिनानिमित्त मंगळवारी शिवाजी विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांनी अभिवादन केले.

# विद्यापीठात शिवज्योत रॅली

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. सकाळी साडेनऊ वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवज्योत प्रज्वलित करून शिवज्योत रॅलीस प्रारंभ झाला.

मुख्य प्रशासकीय इमारतीपासून परीक्षा भवन, आरोग्य केंद्र, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, कन्झ्युमर स्टोअर, विद्यार्थिनी वसतिगृह, भूगोल अधिविभाग अशी रॅली मुख्य इमारत परिसरात दाखल झाली. येथे विद्यार्थी-विद्यार्थिनींनी ढोल, हलगीच्या तालावर लेझीमचे सादरीकरण केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरात शिवपुतळ्याच्या प्रतिकृतीस कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, मानव्यविज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, आदी उपस्थित होते.

लोकमत



शिवस्वराज्य दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष व्याख्यानात डॉ. रमेश जाधव यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. प्रल्हाद माने, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. एस. एन. पवार, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि डॉ. प्रतिमा पवार उपस्थित होते.

# स्वराज्य सुकर व्हावे यासाठीच राज्याभिषेक

## जाधव : विलास संगवे स्मृती व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** छत्रपती शिवाजी महाराज यांनी कोणत्याही स्वार्थापायी नव्हे, तर कायदेशीर राजेपणाची मोहोर उमटवून स्वराज्याची वाटचाल अधिक सुकर करण्याच्या दृष्टीने राज्याभिषेक करवून घेतला, असे प्रतिपादन समाजशास्त्रज्ञ तथा ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव यांनी मंगळवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचा समाजशास्त्र अधिविभाग, विद्यार्थी विकास विभाग आणि नेहरू अभ्यास केंद्राच्या वतीने शिवस्वराज्य दिनानिमित्त डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत डॉ. जाधव यांचे विशेष व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. जाधव म्हणाले, शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करवून घेणे ही विजयनगरच्या ऱ्हासानंतर या देशात घडलेली एक महत्त्वाची ऐतिहासिक घटना आहे. शिवाजी महाराजांना राज्याभिषेकाच्या बरोबरीने छत्र, सिंहासन, पोशाख हे तर अभिप्रेत होतेच, पण त्याहीपेक्षा कितीतरी अधिक पटीने आपल्या कायदेशीर राजेपणाची मोहोर जनमानसावर सर्वदूर उमटविणे महत्त्वाचे वाटत होते. मोहिते-निंबाळकर यांच्यासारख्यांनी महाराजांना सातत्याने त्यांच्या राजेपणाविषयी हिणविले. अशा मंडळींना शिवाजी महाराजांना 'आता मी राजा आहे,' असा कडक संदेश राज्याभिषेकाच्या माध्यमातून द्यावयाचा होता.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, एकराष्ट्र भावनेची निर्मिती हा छत्रपती शिवाजी महाराजांचा स्वराज्य स्थापनेमागील सर्वांत महत्त्वाचा हेतू होता. समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रतिमा पवार यांनी प्रास्ताविक केले. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी परिचय करून दिला. आकाश ब्राह्मणे, सद्दाम मुजावर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. यावेळी डॉ. एस. एन. पवार, डॉ. जगन कराडे, डॉ. आर. बी. पाटील, इतिहास संशोधक इंद्रजित सावंत उपस्थित होते.

### राजेपणाची मोहोर

छत्रपती शिवाजी महाराज यांना राज्याभिषेकाच्या बरोबरीने छत्र, सिंहासन, पोशाख हे तर अभिप्रेत होतेच, पण त्याहीपेक्षा कितीतरी अधिक पटीने आपल्या कायदेशीर राजेपणाची मोहोर जनमानसावर सर्वदूर उमटविणे महत्त्वाचे वाटत होते, असे डॉ. जाधव म्हणाले.

जनसंपर्क कक्ष
07 JUN 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माणसांमुळेच निसर्गाचे अपरिमित नुकसान

## डॉ. व्ही. एन. शिंदे : पर्यावरणावर व्याख्यानात केले मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : माणूस निसर्गाचे अपरिमित नुकसान करून पृथ्वीला विनाशाकडे घेऊन जात आहे, निसर्गाची हानी टाळण्यासाठी पर्यावरणपूरक जीवन जगणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या वतीने 'महाराष्ट्राची संकल्पना आणि लघु संशोधन प्रबंध सुलभ लेखन पद्धती' या विषयावर ऑनलाइन कार्यशाळेच्या 'पर्यावरण अनुकूल राहणीमान आणि पर्यावरण पूरक कौशल्य आधारित प्रयोग' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे होते. यावेळी उपकुलसचिव डॉ. संजय कुबल, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे उपस्थित होते. डॉ. शिंदे म्हणाले की, मानवाने स्वार्थी प्रवृत्तीने स्वतःच्या स्थैर्य आणि सुरक्षिततेसाठी निसर्गाचा नियम मोडला. अन्न, पाणी आणि हवा या तीन गोष्टीची मानवाला जगण्यासाठी आवश्यकता आहे. त्याचे जतन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. निसर्गाची लयलूट करून भौतिक सुखाच्या मागे लागून आपले जीवन सुखाचे बनवत आहोत, हा विचार गैर आहे. यातून पृथ्वीला आपण विनाश्याच्या उंबरठ्यावर घेऊन जात आहोत. प्रा. डॉ. सचिन भोसले यांनी प्रास्ताविक केले. वैभव पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले.

महासत्ता

# निसर्गाची हानी टाळण्यासाठी पर्यावरण पूरक जीवन जगणे आवश्यक : डॉ.शिंदे

**कोल्हापूर ता.५ (प्रतिनिधी)-** माणूस निसर्गाचे अपरिमित नुकसान करून पृथ्वीला विनाशा कडे घेऊन जात आहे. त्यामुळे निसर्गाची हानी टाळण्यासाठी पर्यावरण पूरक जीवन जगणे आवश्यक आहे असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र.कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या राज्यशास्त्र विषया अंतर्गत 'महाराष्ट्राची संकल्पना आणि लघु संशोधन प्रबंध सुलभ लेखन पद्धती' या विषयावर राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेच्या पर्यावरण अनुकूल राहणीमान आणिपर्यावरण पूरक कौशल्य आधारित प्रयोग या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक प्रा.डॉ.डी.के.मोरे होते. यावेळी उपकुलसचिव डॉ.संजय कुबल, उपकुलसचिव सी.एस.कोतमिरे यासह विद्यार्थी, समन्वयक, सहा.प्राध्यापक प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व सेवक उपस्थित होते.

07 JUN 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात

## कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या उपस्थितीत शिवज्योत रॅली; विद्यार्थी-विद्यार्थिनींकडून लेझीमचे सादरीकरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयघोषात मोठ्या उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला.

कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवज्योत प्रज्वलित करून शिवज्योत रॅलीस प्रारंभ झाला. मुख्य प्रशासकीय इमारतीपासून परीक्षा भवन, आरोग्य केंद्र, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, कन्झ्युमर स्टोअर, विद्यार्थिनी वसतिगृह, भूगोल अधिविभाग व पुन्हा मुख्य इमारत परिसरात दाखल झाली.

विद्यार्थी-विद्यार्थिनींनी ढोल, हलगीच्या तालावर लेझीमचे सादरीकरण केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरात शिवपुतळ्याच्या प्रतिकृतीस कुलगुरू व प्र-कुलगुरू यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, अजित चौगुले, डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. शिवलिंगप्पा सपली, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. डी.आर. मोरे, मिलिंद भोसले आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवराज्याभिषेक दिनानिमित्त विद्यापीठ परिसरात शिवज्योत रॅली काढण्यात आली. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलित करून रॅलीस प्रारंभ झाला.** (छाया : अर्जुन टाकळकर)

07 JUN 2023

पुढारी


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वराज्याची वाटचाल सुकर करण्यासाठीच छत्रपती शिवाजी महाराजांकडून राज्याभिषेक

## डॉ. रमेश जाधव यांचे प्रतिपादन; डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी कोणत्याही स्वार्थापायी नव्हे, तर कायदेशीर राजेपणाची मोहोर उमटवून स्वराज्याची वाटचाल अधिक सुकर करण्याच्या दृष्टीने राज्याभिषेक करवून घेतला. १५६५ मध्ये तालीकोटच्या लढाईमुळे विजयनगरचे साम्राज्य लयास गेल्यानंतर शतकभरानंतर पुन्हा एतद्देशीय राज्याची प्रस्थापना जाहीर करणारा ऐतिहासिक क्षण होता, असे प्रतिपादन समाजशास्त्रज्ञ तथा ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव यांनी केले.



**कोल्हापूर : शिवस्वराज्य दिनानिमित्त व्याख्यानात बोलताना डॉ. रमेश जाधव.**

शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र अधिविभाग, विद्यार्थी विकास विभाग व नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शिवस्वराज्य दिनानिमित्त डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यानमालेंतर्गत डॉ. जाधव बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. जाधव म्हणाले, शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करवून घेणे ही विजयनगरच्या ऱ्हासानंतर या देशात घडलेली एक महत्त्वाची ऐतिहासिक घटना आहे. मोहिते-निंबाळकरांसारख्यांनी महाराजांना सातत्याने त्यांच्या राजेपणाविषयी हिणविले. अशा मंडळींना शिवाजी महाराजांना 'आता मी राजा आहे' असा कडक संदेश राज्याभिषेकाच्या माध्यमातून द्यावयाचा होता.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, एकराष्ट्र भावनेची निर्मिती छत्रपती शिवाजी महाराजांचा स्वराज्य स्थापनेमागील महत्त्वाचा हेतू होता. त्यांच्या विविध पैलूंचा मागोवा घेत राहणे आवश्यक आहे.

समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार यांनी प्रास्ताविक केले. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. आकाश ब्राह्मणे, सद्दाम मुजावर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. यावेळी डॉ. एस.एन. पवार, डॉ. जगन कराडे, डॉ. आर.बी. पाटील, इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत, डॉ. अर्चना जगतकर, डॉ. अविनाश भाले उपस्थित होते.

पुढारी



रायगड : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी किल्ले रायगडावर स्वच्छता मोहीम राबवली.

# शिवाजी विद्यापीठ एनएसएस विभागातर्फे रायगडावर स्वच्छता मोहीम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ व श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील २०० हून अधिक स्वयंसेवकांनी शिवराज्याभिषेक दिनानिमित्त दुर्गराज रायगडावर स्वच्छता मोहीम, प्लास्टिकमुक्ती अभियान, वाहतूक नियंत्रणासाठी मदत केली. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्यासह इतर अधिकाऱ्यांनी रायगडावर उपस्थित राहून उपक्रमात सहभाग घेतला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यापीठस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त होत आहे. शिबिरांतर्गत शिवाजी विद्यापीठात व किल्ले रायगड येथे विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम आणि प्लास्टिक मुक्ती अभियान राबवले. या मोहिमेंतर्गत सुमारे १३ हजार किलोहून अधिक कचरा व प्लास्टिकचे विद्यार्थ्यांनी संकलन केले. पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, प्लास्टिक कचरा यांची ९० हून अधिक पोती संकलित करून पुनर्चक्रीकरणासाठी तो एकत्रित करून ठेवला. किल्ले रायगडावर विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. शिवचरित्राचे अभ्यासक डॉ. केदार फाळके यांनी शिवचरित्रावर व प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे यांनी पर्यावरण व प्लास्टिक मुक्ती अभियानासंदर्भात व्याख्याने दिली.

यावेळी माजी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, एन. एस. एस. चे संचालक डॉ. तानाजी चौगुले आदी उपस्थित होते. डॉ. के. एम. देसाई डॉ. ए.बी. बलुगडे आदींनी संयोजन केले. डॉ.पी.बी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सयाजीराव गायकवाड यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 JUN 2023

पुण्यनगरी

# पोवाड्यांनी दणाणला शिवाजी विद्यापीठ परिसर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मोठ्या उत्साहात विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा परिसर पोवाड्यांनी दणाणून गेला.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवज्योत प्रज्वलित करून रॅलीस प्रारंभ झाला.



शिवाजी विद्यापीठ परिसरात शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रमात उपस्थित कुलगुरू, प्र-कुलगुरू यांच्यासह मान्यवर. (छाया : पांडुरंग पाटील)

शिवपुतळ्यास, तसेच प्रतिकृतीस कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

या उपक्रमात कुलसचिव डॉ. विलास शिंदे, मानव्यविज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, विद्यार्थी विकास केंद्राचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, माजी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, राज्य कर्मचारी महासंघाचे महासचिव मिलिंद भोसले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क [redacted]
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 JUN 2023
पुण्यनगरी

# रायगडावर स्वच्छता मोहीम

## शिवाजी विद्यापीठ, शहाजी महाविद्यालयाचा उपक्रम : १३ हजार किलो प्लास्टिक कचरा संकलन

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठ आणि श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील पावणेदोनशेहून अधिक स्वयंसेवकांनी शिवराज्याभिषेक दिनानिमित्त दुर्गराज रायगडावर स्वच्छता मोहीम, प्लास्टिकमुक्ती अभियान आणि वाहतूक नियंत्रणासाठी मदत केली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व इतर अधिकाऱ्यांनी रायगडावर उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यापीठस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिर २ ते ८ जून या कालावधीत सुरू आहे. शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्ताने हे विशेष संस्कार शिबिर होत आहे. या शिबिरांतर्गत शिवाजी विद्यापीठात आणि किल्ले रायगडवर विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम, प्लास्टिकमुक्ती अभियान राबवले. सुमारे १३ हजार किलोंहून अधिक केरकचरा, प्लास्टिक विद्यार्थ्यांनी गोळा करून त्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावली.

प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, माजी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखा अधिकारी डॉ. अजित चौगुले, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. टी. एम. चौगुले, नवयुग शिक्षण संकुल महाडचे अध्यक्ष रंजितसिंह भोसले, एस. एम. पालकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.



एनएसएसचे प्रोग्राम ऑफिसर डॉ. के. एम. देसाई, डॉ. ए. बी. बलुगडे, डॉ संदीप पाटील, डॉ. संग्राम मोरे, प्रा. आशुतोष मगदूम, एस. ए. मुंडे डॉ. पी. बी. पाटील यांनी संयोजन केले. शिवचरित्राचे अभ्यासक डॉ. केदार फाळके यांनी शिवचरित्रावर व शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पर्यावरण आणि प्लास्टिकमुक्ती अभियान यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या उपक्रमास श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मानसिंग बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांचेही प्रोत्साहन मिळाले. डॉ. सयाजीराव गायकवाड यांनी आभार मानले.

0 7 JUN 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रजिस्ट्रेशन ते डिक्लरेशन एका क्लिकवर

## वेगवान प्रक्रियेसाठी शिवाजी विद्यापीठाचे पाऊल, पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना होणार लाभ

**कोल्हापूर : वैभव गोंधळी**

**पीएच.डी. पूर्ण करताना रजिस्ट्रेशन ते डिक्लरेशन ही प्रक्रिया अनेकदा वेळखाऊ ठरते. या प्रक्रियेत सुलभता आणि गतिमानता आणण्यासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे सर्व प्रक्रियेचे संगणकीकरण करण्यास येत आहे. या प्रणालीचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून, येत्या दोन महिन्यांत ही प्रणाली कार्यान्वित होणार आहे. त्याचा लाभ पीएच.डी.साठी नोंदणी करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना होणार आहे.**



भाग - ३

दिवसेंदिवस संशोधनाचा टक्का वाढत आहे. शिवाजी विद्यापीठात हजारो विद्यार्थी पीएच.डी.साठी नोंदणी करतात; मात्र पीएच.डी.साठीची नोंदणी ते पीएच.डी. पूर्ण केल्यानंतर केले जाणारे डिक्लरेशन या प्रक्रियेमध्ये मोठा काळ वाया जातो. त्यामुळे संशोधन पूर्ण करण्याबरोबरच विद्यार्थ्यांना या कागदोपत्री प्रक्रियांसाठी वेळ खर्च करावा लागतो. त्यामुळे शिवाजी विद्यापीठातर्फे ही सर्व प्रक्रिया संगणकीकृत करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांची नोंदणी ते त्याचा पीएच.डी. पूर्ण करण्यापर्यंत प्रवास एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे या प्रक्रियेस गती येणार आहे. ज्या ठिकाणी गरजेपेक्षा जास्त काळ विद्यार्थ्यांची फाईल राहील, तेथे प्रशासनातर्फे पाठपुरावा करून ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. यामुळे पूर्वीपेक्षा कमी वेळेत आणि कमी त्रासामध्ये ही प्रक्रिया पार पाडणे विद्यार्थ्यांना आणि प्रशासनालाही शक्य होणार आहे.

वेळखाऊ प्रक्रिया बंद झाल्याने येत्या काळात संशोधक विद्यार्थ्यांचा ओढा शिवाजी विद्यापीठाकडे अधिक वाढेल, असा विश्वास प्रशासनास आहे.

(समाप्त)

### विद्यार्थ्यांचा वेळ वाचणार

ऑफलाईन प्रक्रियेमुळे पूर्वी विद्यार्थ्यांना विद्यापीठात वारंवार फेऱ्या माराव्या लागत होत्या. नव्या प्रणालीमुळे प्रक्रियेवर कालमर्यादा असणार आहे. कोणत्याही टप्प्यावर प्रक्रिया रेंगाळल्यास विद्यापीठ प्रशासनातर्फे पाठपुरावा करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा मनःस्ताप, वेळ व पैसा वाचणार आहे.



### संशोधनाचा कालावधी कमी होणार

शिवाजी विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. अशा काळात पीएच. डी. विद्यार्थ्यांच्या प्रक्रियेचे संगणकीकरण झाल्याने ही प्रक्रिया गतीने पार पडणार आहे. या प्रणालीचा लाभ विद्यार्थ्यांना होणार आहे. संशोधनाचा कालावधी कमी होण्यास मदत होणार आहे.

- डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी कुलसचिव

0 7 JUN 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

भोवताल

# मृत्यूचा सोनेरी सापळा!

डॉ. व्ही.एन. शिंदे

जागतिक पर्यावरण दिन ५ जून रोजी साजरा झाला. या वर्षीच्या पर्यावरण दिनासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने प्लास्टिक प्रदूषणापासून मुक्ती (Beat the Plastic Pollution) ही मध्यवर्ती संकल्पना दिली. प्लास्टिकने जगाला विळखा घातला आहे. हा विळखा हळूहळू घट्ट आवळत आहे. संपूर्ण जीवसृष्टी विनाशाकडे वाटचाल करत आहे. आजही जगातील बहुतांश नेत्यांना याचे महत्त्व पटले तरी त्यांना हा विळखा सोडवण्यासाठी प्रयत्न करायचे नाहीत. तसे केले तर निवडणुकांत त्यांना पराभव पत्करावा लागेल, असे वाटत असावे. प्लास्टिकने आपले जीवन सुखकर झाले असे वाटते. मात्र, आपण विषाला हाताळत आहोत, याची जाणीव सामान्यांना नाही. संयुक्त राष्ट्रसंघाने सर्वच राष्ट्रांना प्लास्टिक प्रदूषणाचा पराभव करण्याचे आवाहन केले आहे.

आपण बिनधास्तपणे प्लास्टिक वस्तू, पिशव्या हाताळतो. प्लास्टिक वरदान असल्याच्या भ्रमात आपण आहोत. पेट्रोलजन्य पदार्थांपासून प्लास्टिकचे उत्पादन करतात. खनिज तेलाचे साठे संपत आहेत. ते संपल्यावर प्लास्टिकचे उत्पादन थांबणार आहेच. मात्र, तोपर्यंत प्लास्टिक उत्पादनात मानवाने जी आघाडी घेतली आहे ती पाहता, केवळ मानवच नव्हे, तर संपूर्ण जीवसृष्टीच संकटात आली आहे.

मानवाने स्वतःच्या सुखासाठी, सोयीसाठी प्लास्टिक वापरण्यास सुरुवात केली. मात्र, प्लास्टिकने सर्वांनाच आजाराच्या विळख्यात घेण्यास सुरुवात केली. याचे गांभीर्य समजून घेण्यासाठी काही आकडेवारी पाहायला हवी. प्लास्टिकच्या शोधानंतर काही वर्षांतच त्याचा प्रसार झाला. या तंत्रज्ञानाचे केवळ फायदेच सांगण्यात आले. प्लास्टिक हाताळणे सोईचे असल्याने लवकरच लोकप्रिय झाले. प्लास्टिकचा वापर इतका वाढला की, गत ७५ वर्षांत ८.५ अब्ज टन प्लास्टिकचे उत्पादन झाले. प्लास्टिक उत्पादनात अर्थातच अमेरिका आघाडीवर आहे.

जगाची लोकसंख्या आठ अब्ज आहे. म्हणजेच आजवर प्रति माणशी एक टन प्लास्टिकचे उत्पादन झालेले आहे. एक मिलिमीटर प्लास्टिकचे विघटन होण्यास ४००० वर्षे लागतात. म्हणजे आजवर उत्पादित करण्यात आलेल्या प्लास्टिकचे निसर्गतः विघटन झालेले नाही. यापैकी केवळ ९ टक्के प्लास्टिक पुनर्वापरासाठी पाठवण्यात आले किंवा पुनर्वापर झाला. संशोधकांच्या मते १२ टक्के प्लास्टिक जाळण्यात आले. जाळल्यानंतर जमिनीवरील प्लास्टिक नष्ट झाले तरी त्यातून बाहेर पडलेले विषारी वायू आपल्याभोवती पिंगा घालत वातावरणात फिरताहेत. तीन टक्के प्लास्टिक समुद्राच्या पाण्यात मिसळले आहे. ते मिठाच्या रूपातून पुन्हा आपल्या पोटात यायला सज्ज असते. उर्वरित ७६ टक्के प्लास्टिक जगभर कचऱ्याच्या ढिगाच्या रूपात साठलेले आहे. ते अन्न, पाणी आणि हवा या सजीवांसाठीच्या मूलभूत घटकांमध्ये मिसळून सर्व सजीवांच्या शरीरात शिरत आहे. माणसाची आकडेवारी उपलब्ध नसली, तरी दरवर्षी सुमारे दहा लाख जलचर प्लास्टिकमुळे जीव गमावत आहेत. संशोधकांच्या मते अन्न, पाणी आणि हवेतून दर आठवड्याला पाच ग्रॅम मायक्रोप्लास्टिक मानवाच्या शरीरात जाते. यातून अनेक आजार उद्भवतात. हे संकट दारात नसून पोटात शिरले आहे. हे हळूहळू भिनत जाणारे विष आहे. त्याचे परिणाम तत्काळ दिसत नाहीत. त्यामुळे कोरोनाचा हल्ला झाल्यावर जग जसे एकवटले, तसे प्लास्टिकच्या वापराविरोधात एकवटत नाही.

प्लास्टिक स्वस्त, हाताळण्यास सोपे, कमी वजनाचे, टिकाऊ असल्याने त्याचे तोटे लक्षात आले तरी कोणी उत्पादन थांबवत नाही. अनेक देशांनी प्लास्टिकबंदी केली, तरी त्या देशातही प्लास्टिकचा वापर १०० टक्के थांबलेला नाही.



आजही दर मिनिटाला एक ट्रक प्लास्टिक कचरा तयार होतो.

ते समुद्राच्या पाण्यासह सर्वत्र मुक्त संचार करू लागल्याने त्याचा त्रास थांबवण्यासाठी कोण्या एका सरकारने नव्हे, तर समग्र मानव जातीने स्वतःच प्रयत्न करायला हवेत. तसे होताना दिसत नाही. उलट आजही दर मिनिटाला एक ट्रक प्लास्टिक कचरा तयार होतो. हा कचरा संपूर्ण जीवसृष्टीसाठी घातक आहे. त्यामुळे आपण प्रत्यक्षात प्लास्टिक नावाचे विष हाताळत आहोत; आपल्या मरणाशी खेळत आहोत. या सोनेरी मृत्यूच्या सापळ्याचे गांभीर्य लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र संघाने या वर्षीच्या पर्यावरण दिनासाठी 'प्लास्टिक प्रदूषणाचा पराभव' संकल्पना निवडली. या संकल्पनेला अनुसरून देश विदेशात मोठे कार्यक्रम होतील. मात्र, अनेक कार्यक्रमावेळी मोठ्या प्रमाणात प्लास्टिक वापरलेले असेल. निदान पाणी तरी प्लास्टिकच्या बाटल्यांतील असेल.

भारतात आजमितीला सुमारे ५० लाख टनांपेक्षा जास्त प्लास्टिक कचरा तयार झालेला आहे. दररोज १६,००० टन प्लास्टिक कचरा तयार होतो. हा कचरा सर्वत्र पसरलेला आहे. महाराष्ट्रात तयार होणारा कचरा इतर राज्यांच्या तुलनेत जास्त म्हणजे दरवर्षी चार लाख टनांपेक्षा जास्त तयार होतो.

भारतासह जगातील सर्वच राष्ट्रांनी प्लास्टिक बंदीसाठी कठोर उपाय योजायला हवेत. आज पुनर्वापर न करता येणाऱ्या एकल वापराच्या प्लास्टिकवर न्यूझीलंड, चीन, युरोपियन देश आणि अमेरिका खंडातील काही देशांनी बंदी घातली आहे. भारतातही १ जुलै २०२२ पासून बंदी लागू झाली. अमेरिका आणि युरोपमध्ये ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे प्लास्टिक एकल वापराचे मानले जाते. भारतात मात्र एकदा वापरून फेकून दिले जाणारे सर्व प्रकारचे प्लास्टिक एकल वापराचे मानले जाते. भारतातील एकल वापर प्लास्टिकची व्याख्या पाहता आज एकल वापराच्या प्लास्टिक बंदीचे काय होते, याचा प्रत्येकाने विचार करायला हवा.

२०५० पर्यंत खनिज तेलापैकी २० टक्के तेल प्लास्टिक निर्मितीसाठी वापरले जाईल, असा अंदाज संयुक्त राष्ट्र संघाने व्यक्त केला आहे. याच पार्श्वभूमीवर पॅरिसमध्ये ११ जूनला हवामान बदलासंदर्भात जागतिक परिषद होत आहे. यात प्लास्टिकवर पूर्ण बंदी घालावी, यासाठी तज्ज्ञ आग्रही आहेत.

प्लास्टिकचे उत्पादन थांबवावे, अशी अनेक राष्ट्रांची, पर्यावरण तज्ज्ञांची मागणी आहे; तर केवळ आजवरचा प्लास्टिक कचरा नष्ट करण्याचा ठराव करावा, असे दुसऱ्या गटाचे मत आहे. म्हणजे जुना कचरा संपवताना नव्या कचऱ्याची निर्मिती होऊ द्या, असेच म्हणायचे आहे. यावर सर्व राष्ट्रांमध्ये एकमत होण्याची चिन्हे नाहीत. याही पुढे जात विनी लाऊ यांनी समुद्राच्या पाण्यामध्ये मिसळणाऱ्या टायरच्या धुळीचाही विचार करण्याची मागणी केली आहे. त्यासंदर्भातही ठराव करण्याची मागणी केली आहे. आज टायरपासून निघणारी धूळ कोणीच विचारात घेत नाही. मात्र, त्यामुळे होणारे प्रदूषणही मोठे घातक असल्याचे संशोधकांच्या लक्षात आले आहे. पूर्ण प्लास्टिकबंदीला अमेरिकेचा विरोध आहे. अमेरिकेने प्लास्टिक निर्मितीत मोठी गुंतवणूक केलेली आहे. कारण आज प्लास्टिकचे सर्वाधिक उत्पादन अमेरिकेतच होते. एकल वापराच्या प्लास्टिकवर बंदी घालण्यास अनेक राष्ट्रे तयार आहेत. मात्र, संपूर्ण बंदीचा प्रस्ताव एकमताने स्वीकारला जाण्याची शक्यता नाही. त्यामुळे उत्पादन थांबत नसेल तर आपणच प्रत्येकाने वैयक्तिक पातळीवर प्लास्टिकचा वापर थांबवायला हवा!

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४०

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 JUN 2023 सकाळ

## व्याख्याने, स्पर्धांसह विविध उपक्रमांनी शिवराज्याभिषेक दिन सोहळा

# शिवरायांचा अखंड जयघोष.

**कोल्हापूर, ता. ६ : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३४९ व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शहर आणि परिसरात आज विविध कार्यक्रमांचे आयोजन झाले. भव्य मिरवणुकीबरोबरच विविध शाळा, महाविद्यालये, संघटना व संस्थांतर्फे अभिवादनाबरोबरच स्पर्धा, व्याख्याने, आतषबाजी, प्रसाद वाटप आदी कार्यक्रमांवर भर देण्यात आला.**



कोल्हापूर : शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास अभिवादन प्रसंगी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासमवेत उपस्थित अधिकारी.

### शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिन छत्रपती शिवरायांच्या जयघोषात मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा झाला. सनईच्या सुरांमुळे आज सकाळपासूनच विद्यापीठातील वातावरण प्रसन्न बनले होते. सकाळी साडेआठ वाजल्यापासून विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवरायांच्या भव्य अश्वारूढ पुतळा परिसरात पोवाडे लावले होते. सकाळी ठीक साडेनऊ वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवज्योत प्रज्वलित करून शिवज्योत रॅलीस प्रारंभ झाला. मुख्य प्रशासकीय इमारतीपासून परीक्षा भवन, आरोग्य केंद्र, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, कन्झ्युमर स्टोअर, विद्यार्थिनी वसतिगृह, भूगोल अधिविभाग अशी पुन्हा मुख्य इमारत परिसरात दाखल झाली. येथे विद्यार्थी-विद्यार्थिनींनी ढोल, हलगीच्या तालावर लेझीमचे सादरीकरण केले. त्यानंतर छत्रपती शिवरायांच्या पुतळा परिसरात शिवपुतळ्याच्या प्रतिकृतीस कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन केले. मूळ पुतळ्यासही पुष्प वाहून अभिवादन केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीत सादर केले.

या उपक्रमात कुलसचिव डॉ. विलास शिंदे, मानव्यविज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, विद्यार्थी विकास केंद्राचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, माजी बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, राज्य कर्मचारी महासंघाचे महासचिव मिलींद भोसले यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांसह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून रायगडावर स्वच्छता मोहीम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजना विभागातील पावणे दोनशेहून अधिक स्वयंसेवकांनी ३५० व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त दुर्गराज रायगडावर स्वच्छता मोहीम, प्लास्टिक मुक्ती अभियान आणि वाहतूक नियंत्रणासाठी मदत केली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, इतर अधिकाऱ्यांनी रायगडावर उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय सेवा योजना एनएसएस विभागाचे विद्यापीठस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबिर दोन जून ते आठ जून कालावधीत सुरू आहे. शिवराज्याभिषेक दिन सोहळ्या निमित्त विशेष संस्कार शिबिर होत आहे. शिबिरांतर्गत शिवाजी विद्यापीठात आणि किल्ले रायगडवर विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम प्लास्टिक मुक्ती अभियान राबवले. सुमारे १३ हजार किलोहून अधिक केरकचरा प्लास्टिक विद्यार्थ्यांनी गोळा करून त्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावली. पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, प्लास्टिक कचऱ्यांची ९० हून अधिक पोती संकलित करून त्याच्या पुनरुत्पादनासाठी तो एकत्रित करून ठेवला. किल्ले रायगडावर विद्यार्थ्यांनी श्रमदान केले.

डॉ. शिर्के यांनी छत्रपती शिवरायांची प्रेरणा घेऊन जीवनात वाटचाल करावी, असे आवाहन केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखा अधिकारी डॉ. अजित चौगुले, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, एन.एस.एस विभागाचे संचालक डॉ. टी. एम. चौगुले, रंजितसिंह भोसले, प्रशासकीय अधिकारी एस. एम. पालकर उपस्थित होते. डॉ. के. एम. देसाई, डॉ. ए. बी. बलुगडे, डॉ. संदीप पाटील, डॉ. कुलकर्णी, डॉ. सयाजीराव, डॉ. संग्राम मोरे, प्रा. आशुतोष मगदूम, एस. ए. मुंडे, डॉ. पी. बी. पाटील यांनी संयोजन केले.डॉ. केदार फाळके, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्याख्याने दिली. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांचे प्रोत्साहन मिळाले. डॉ. टी. एम. चौगुले, डॉ. के. एम. देसाई, डॉ. बलुगडे यांनी संयोजन केले. डॉ. पी. बी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सयाजीराव गायकवाड यांनी आभार मानले.

07 JUN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वराज्याची वाटचाल सुकर करण्यासाठीच राज्याभिषेक

## डॉ. रमेश जाधव; समाजशास्त्र, विद्यार्थी विकास, नेहरू अभ्यास केंद्रातर्फे व्याख्यान



कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना डॉ. रमेश जाधव.

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : "छत्रपती शिवरायांनी कोणत्याही स्वार्थापायी नव्हे, तर कायदेशीर राजेपणाची मोहोर उमटवून स्वराज्याची वाटचाल अधिक सुकर करण्याच्या दृष्टीने राज्याभिषेक करवून घेतला. सन १५६५ मध्ये तालीकोटच्या लढाईमुळे विजयनगरचे साम्राज्य लयास गेल्यानंतर शतकभरानंतर पुन्हा एतद्देशीय राज्याची प्रस्थापना जाहीर करणारा तो ऐतिहासिक क्षण होता," असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा समाजशास्त्र अधिविभाग, विद्यार्थी विकास विभाग आणि नेहरू अभ्यास केंद्रातर्फे शिवस्वराज्य दिनानिमित्त डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत व्याख्यान झाले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. डॉ. जाधव यांनी 'परप्रांतीयांच्या नजरेतून शिवराज्याभिषेक' यावर प्रकाशझोत टाकला.

डॉ. जाधव म्हणाले, "शिवरायांनी राज्याभिषेक करवून घेणे ही विजयनगरच्या ऱ्हासानंतर या देशात घडलेली एक महत्त्वाची ऐतिहासिक घटना आहे. तत्कालीन संघर्ष हा दोन धर्मांमधील नव्हता, तर ऐतद्देशीय आणि परकीय यांच्यामधील तो सत्तासंघर्ष होता. शिवरायांना राज्याभिषेकाच्या बरोबरीने छत्र, सिंहासन, पोशाख हे तर अभिप्रेत होतेच, पण आपल्या कायदेशीर राजेपणाची मोहोर जनमानसावर सर्वदूर उमटविणे महत्त्वाचे वाटत होते. स्थानिकांना त्यांची हिंदवी जीवनपद्धती महाराजांनी पुन्हा प्राप्त करून दिली. सर्वधर्मसमभावाची हमी देतानाच आपल्या रयतेला परकीय आक्रमकांपासून पूर्ण संरक्षण देऊन निर्धास्त राहणीमानाची शाश्वती महाराजांना प्रदान केली. स्वतःचे हिंदवी स्वराज्य प्रस्थापित करीत असताना राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत आपल्या स्वराज्याला मान्यता प्राप्त करवून घेण्याचा महाराजांचा इरादा या राज्याभिषेकाने साध्य झाला. आंतरराष्ट्रीय अभ्यासकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची दखल घेतल्यामुळेच इंग्रजीसह हिंदी, फारसी, डच, जर्मन, पोर्तुगीज आदी भाषांमध्ये त्यांच्याविषयीची विपुल साधने निर्माण झाली.

पश्चिम बंगालचे जदुनाथ सरकार यांनी १२ वर्षे अथक संशोधन करून औरंगजेबाचे पाच खंडी चरित्र साकारले. औरंगजेबावरील संशोधन करीत असताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्राकडे ते आकृष्ट झाले. औरंगजेबाच्या कट्टरतेला हिंदवी स्वराज्य स्थापन करून कर्तबगारी सिद्ध करणाऱ्या महाराजांकडे त्यांचे लक्ष वेधले गेले."

समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रतिमा पवार यांनी स्वागत केले. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी परिचय करून दिला. आकाश ब्राह्मणे, सद्दाम मुजावर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. डॉ. एस. एन. पवार, डॉ. जगन कराडे, डॉ. आर. बी. पाटील, इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत, डॉ. अर्चना जगतकर, डॉ. अविनाश भाले, समाजशास्त्राचे आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 7 JUN 2023 तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात शिवज्योत रॅली

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिनी सून विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवज्योत रॅलीस प्रारंभ केला.

शिवज्योत रॅली मुख्य प्रशासकीय इमारतीपासून परीक्षा भवन, आरोग्य केंद्र, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, कन्झ्युमर स्टोअर, विद्यार्थिनी वसतिगृह, भूगोल अधिविभागामार्गे पुन्हा मुख्य इमारत परिसरात दाखल झाली. येथे विद्यार्थी-विद्यार्थिनींनी ढोल, हलगीच्या तालावर लेझीमचे सादरीकरण केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरात शिवपुतळयाच्या प्रतिकृतीस कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. अजितसिंह जाधव, अजित चौगुले, डॉ. शिवलिंगप्पा सपली, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. डी. आर. मोरे, मिलींद भोसले आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : विद्यापीठ प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास अभिवादन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.**